# बदलत्या हवामानाचे आव्हान पेलण्यासाठी तंत्रज्ञान वापरा

## ■ कुलगुरू डॉ. संजय सावंत यांचे प्रतिपादन

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग :** बदलते हवामान हा प्रश्न आताच निर्माण झालेला नसून हवामान बदल काही कालावधीपासून होत आलेला आहे. हवामान बदलाचा शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. असे असले तरी या बदलाला सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले उत्पादन वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी केले. ते येथील हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे बिजभाषक म्हणून बोलत होते.

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी विद्यापीठ व देशपातळीवर संशोधन होत आहे. त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घेणे गरजेचे आहे. कोकण



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. संजय सावंत, संजय भावे, भाई परमेकर, विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. एस. यू. दरेकर, प्रेमानंद देसाई व अन्य.

प्रदेश हा सद्य:स्थितीत हवामान बदलापासून काही प्रमाणात सुरक्षित असला तरी भविष्यात ही समस्या वाढण्याचा धोका नाकारता येणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविणे गरजेचे आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. संजय भावे यांनी आपण शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. शेतीला जर आपण इतर उद्योगाची जोड दिल्यास व पूर्णवेळ शेती केल्यास त्याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी महाविद्यालयात होणाऱ्या सांस्कृतिक विविध उपक्रमासाठी स्टेज तयार करून दिल्याबद्दल त्यांचा कुलगुरूंच्या हस्ते, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

चर्चासत्राची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नवनिर्माण शिक्षण संस्थेचे संचालक भाई परमेकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, प्रा. राजेंद्र केरकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सेमिनारचे संयोजक डॉ. एस. यू. दरेकर आदि उपस्थित होते.

अध्यक्षीय सामारोपामध्ये कुलगुरू डॉ. संजय सावंत तसेच अतिथी यांच्या विधानावर ठामपणे मत व्यक्त करत सर्वांनी पुन्हा एकदा शेतीकडे वळले पाहिजे, असे डॉ. सुभाष सावंत म्हणाले. दोन दिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक सेमिनारचे संयोजक डॉ. एस. यू. दरेकर यांनी केले. समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. संजय खडपकर, तर आभार डॉ. सोपान जाधव यांनी मानले.

या समारंभासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे संशोधक सहाय्यक डॉ. कस्तुरे, सामाजिक कार्यकर्ते प्रेमानंद देसाई, वेगवेळ्या महाविद्यालयांचे प्रतिनिधी, दापोली, मंडणगड, लांजा, औरंगाबाद, चंदगड, आजरा तसेच दोडामार्ग तालुका कृषी अधिकारी श्री. बनकर, महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.